**कैलासवासी गुरुजी देवजी पादिया चंदावरकर**

कैलासवासी श्री देवजी पादिया चंदावरकर (१९४५ -२०१८) यांचा जन्म एका गरीब घराण्यात झाला. त्यांचे बाबा शेतात काम करीत असत म्हणूनच ते इतर मुलांपेक्षा उत्तम शिक्षणापासून वंचित होते. प्राथमिक शिक्षण झाल्यावर घराची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी शेतात मजूर म्हणून नोकरी करायला सुरुवात केली. त्यांच्या मनात शिकण्याची इच्छा असल्याने ते शिकत राहिले. शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांपैकी काहींना लिहिता- वाचता येत होते. कैलासवासी श्री गुरुजी पादिया त्यांपैकी एक होते. ते पहाटेच्या वेळी ऊसाच्या शेतात काम करीत असत अन् दुपारी कामावरून घरी परतल्यावर सायंकालीन शाळेत जाऊन मराठी भाषा शिकवत असत, विशेष म्हणजे त्या काळी सरकारी शाळा नसल्यामुळे ते गावाच्या '' बैठकी ''च्या ठिकाणी लहान मुलांना मराठी भाषा शिकवत असत.

पुढे प्रो. पुरुषोतम जोशी मॉरिशस देशात आले अन् त्यांनी मराठी साहित्य परिषद ही शिक्षण संस्था काढली. गुरुजी जोशी यांनी वर्गातील उत्तीर्ण झालेल्या दहा विद्यार्थ्यांना महाराष्ट्रात उच्च शिक्षणासाठी पाठवण्याचा निर्णय घेतला. गुरुजी देवजी पादिया यांना महाराष्ट्रात जाऊन शिकण्याची संधी मिळाली. मॉरिशस देशात परतल्यावर त्यांनी मराठी भाषेचे अध्यापन सुरु केले. त्यांच्या विद्यार्थ्यांपैकी गुरुजी सोना धर्मिया , गुरुजी राम मल्लू , डॉ. हॉमराजन गॉरिया व इतर होते.

कैलासवासी श्री गुरुजी पादिया यांचा विवाह कुमारी सीताबाई पडू यांच्याशी झाला. या जोडप्याला तीन मुली व एक मुलगा झाला. दुर्दैवाने त्यांच्या मुलाचे निधन झाले. ज्यावेळी उच्च शिक्षणाकरिता गुरुजी पादिया यांची निवड्णूक झाली त्यावेळी त्यांनी बायकोच्या जबाबदारीवर मुलींना सोडून भारताला उड्डाण घेतले.

कै. गुरुजी पादिया यांनी ला रोजा मराठी सायंकालीन शाळेची स्थापना करण्यामागे मोठे योगदान दिले. दर शनिवारी नऊ ते बारा ला रोजाला मराठी शाळा भरते. मला अजून याची आठवण येते ज्यावेळी मी माझ्या मैत्रिणींसोबत मराठी साहित्य परिषदेच्या ला रोजा शाखेत मराठी भाषा शिकत होते आणि आमचे कै. श्री गुरुजी पादिया होते. त्यांनी लाडीगोडीने आम्हाला उत्तम शिक्षण दिले.

कामसू वृत्तीचे शिक्षक, अध्यक्ष, समाजसेवक अशा गुणांनी त्यांचे व्यक्तीमत्व अलौकिक होते. त्यांच्या सामाजिक सेवेसाठी शासनाने त्यांना मॉरिशस प्रेसिडेंट मेरिटोरिअस सर्विस मेडलची उपाधी देऊन सन्मानीत केले. गुरुजी देवजी पादिया हे एक बुध्दीमान, ध्येयनिष्ठ आणि कर्तबगार वृत्तींचे होते. त्यांनी 'मराठी साहित्य परिषदे' चे अध्यक्ष पद कित्येक वर्षांपर्यंत सांभाळले. मराठी भाषेचे परीक्षक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजक, शिक्षक तसेच डेप्युटी हेड टिचर आणि मराठी अभ्यासक्रम समितीचे सदस्य म्हणून अशा प्रकारच्या विविध भूमिका त्यांनी स्वीकारून व्यवस्थितपणे पार पाडल्या. कै. गुरुजी पादिया मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष पण होते.

मराठी भाषेला जीवीत ठेवण्यास , कैलासवासी गुरुजी देवजी पादिया यांनी नाट्य लेखन सुरुवात केली. त्यांनी इतरांनाही नाटय लेखनाकडे प्रेरित केले. गुरुजी सोना धर्मिया हे त्यांच्या शिष्यांपैकी एक होते. गुरुजी देवजी पादिया यांची नाट्यमहोत्सवासाठी जवळपास ११ नाटकांची नोंद कला व संस्कृती

मंत्रालयाच्या यादीत आहे, त्यांची नाटके पुढीलप्रमाणे आहेत : मृत्यूची सावली, मी चाललो गंगातीरी, हे उपकार कोणाचे, अधुरा संसार, हरभरीत लोखंडाचे, हे तेच का देवळात , शिवबा हा कोंडाणा सरकार, अतूट प्रेम, काय या बायकांची जात, जीवन चक्र, तीन वेडे, गोपीदास आणि मोरस मराठी, काळाचे फिरते चक्र, रिकामा पाळणा, पायरीचा दगड, भुताची सावली, गुरुकुल, बोलणारा पाळणा, या कळ्यांना उमळू द्या. ‘ मी चाललो गंगातीरी’ त्यांच्या ह्या नाटकाने नाट्यमहोत्सवाच्या अंतिम फेरीत चार पारितोषिके मिळविली. उत्कृष्ट नाटक, उत्कृष्ट नट, उत्कृष्ट दिग्दर्शक आणि स्थानिय नाटककार.

साहित्य रसग्रहणाचा आस्वाद कसा घ्यावा त्यांनी मला या विषयावर मार्गदर्शन दिले. दक्षिण विभागात मराठी शिक्षणाचे बिजारोपण यांच्या हस्ते झाले. कै.गुरुजी देवजी पादिया मराठी साहित्य परिषदेच्या वाक्वा शाखेत दर शनिवारी जात असत. ते या सायंकालीन शाळेत परीक्षक व मनेजर होते. आजारी असूनसुध्दा ते दर शनिवारी न चुकता मराठी भाषेच्या प्रचारासाठी जायचे.

के. गुरुजी पादिया चंदावरकर यांनी आध्यात्मिकतेच्या क्षेत्रात हातभार लावला. त्यांनी दिवंगत बाबा कै. श्री गणपत पादिया यांच्या पावल्यावर पाऊल ठेवले. मार दालबेर मराठी उपकारी सभेत त्यांनी सिध्दी विनायक देवाची स्थापना करायला प्रारंभ केला. त्यांनी गावकऱ्यांना सिध्दी विनायक देवाची पूजा कशी करावी यावर प्रबोधन दिले. त्यांनी शनिमहात्मा, सत्यनारायण, गुढी पाडव्यानिमित्त ब्रम्हध्वज पूजा, यज्ञ करायला सुरुवात केली. एवढेच नव्हे तर त्यांनी मंदिराचे भूमीपूजन केले व गणेशोत्सवानिमित्त चाळीस दिनाचा कडक उपवास कसा ठेवावा यावर प्रकाश टाकला. ते शिर्डी साई बाबांचे भक्त होते. आपल्या घरी ते साई बाबांचे कीर्तन करत असत. ते वारंवार महाराष्ट्रात व पुतपरतीला साई बाबांच्या दर्शनाला जात असत.

कै. श्री देवजी पादिया एके काळी मॉरिशस मराठी महामंडळाचे उपअध्यक्ष पण होते. मॉरिशस मराठी महामंडळाचे प्रतिनिधीत्व म्हणून भारतात जात असत. थोडक्यात कैलासवासी श्री देवजी पादिया समाजाच्या कल्याणासाठी सतत राबले व निस्वार्थ भावनेने त्यांनी भाषा, धर्म , संस्कृतीची सेवा व जोपासना केली. साधे जीवन जगून त्यांनी उल्लेखनीय कामे केली.

सौ. सिमलाबाई धर्मिया संपत